# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत–४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/११०९/२०२३,          दिनांक : 15 JUN 2023

## जाहिर प्रसिध्दी

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने खरीप–२०२३ या हंगामाकरीता दि. २१ जुन २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये करावयाची आहेत. सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामांसाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक १९/०६/२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती तसेच कामाची यादी आपल्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आली आहे.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधनकेंद्र,
कर्जत–४१०२०१जि. रायगड

प्रत प्रसिध्दीसाठी–

१) मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
२) मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत,जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३) मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत. जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४) नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.
५) डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ दापोली यांच्या संकेत स्थळावर

Scanned by TapScanner

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्राची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामांचे दरपत्रक

## दरपत्रकाचा विहीत नमुना

प्रति, दिनांक :

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक ....**

संदर्भ : जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/ /२०२३ दि.

महोदय,

वरील संदर्भीय जाहीर प्रसिध्दी पत्रकान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | खरीप—२०२३ हंगामासाठी ( २१ जुन २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमूद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये.......................................... <br> अक्षरी ......................................... |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तरी कृपया माझे दरपत्रक मंजुर करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही :

नांव :

पत्ता :

Scanned by TapScanner

# कंत्राटी कामांच्या अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०.ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

ठेकेदाराची सही :........................................

ठेकेदाराचे नांव :........................................

Scanned by TapScanner

एकात्मिक कृषि पध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड

दि. २१ जुन २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत करावयाच्या कामाची यादी

१) भात पेरणी करणेसाठी गादी वाफे तयार करणे.

२) प्लॉट नं. ४ NPOF मधील प्रयोगासाठी वेगवेगळया भात जातीची गादीवाफ्यावर पेरणी करणे तसेच नर्सरी मधील बणणी करणे करणे सेंद्रीय खताचा डोस देणे. रोपवाटीका व्यवस्थापन करणे.

३) प्रयोगामध्ये आखणी करणे बांध घालणे. सेंद्रीय खतांचा डोस देणे व संस्कारनिहाय भाताची लागवड कारणे.

४) प्लॉट नं. ६ NPOF कर्जत–४ गादीवाफ्यावर भाताची पेरणी करणे तसेच नर्सरी मधील बेणणी रणे व सेंद्रीय खतांचा डोस देणे. व व्यवस्थापन करणे.

५) भात प्रयोगाची लागवड कण्यासाठी आखणी करणे व बांध घालणे सेंद्रीय खतांचा डोस देणे व भाताची लागवड करणे

६) प्लॉट नं. ३ A कर्जत – ९ व धैंचा अंतरपिक टोकण पध्दतीने लागवड करणे भातामधील बेणणी करणे सेंद्रिय खतांचा डोस देणे तसेच प्रयोगासाठी आखणी करणे बांध घालणे

७) भात नर्सरी मधील वेळीवेळी बेणणी करणे.

८) प्रक्षेत्रावरील कुंपण दुरूस्ती करणे व प्रायोगिक प्रक्षेत्रावरील गवत काढून साफसफाई करणे.

९) प्रयोगाच्या बांधवरील गवत काढणे बांध स्वच्छ ठेवणे.

१०) विविध प्रयोगामधील संस्कारनिहाय मातीचे नमुने गोळा करणे.

११) आयत्यावेळी उद्‌भवणारी इतर अनुषंगीक कामे करणे.

ठेकेदाराची सही :..........................................

ठेकेदाराचे नांव:..............................................

Scanned by TapScanner

जा.क्र.प्राकृसंकें/एकुप/ ११०९/२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.,
दि. ०५.०६.२०२३ 5 JUN 2023

प्रति,

मा.संचालक विस्तार शिक्षण
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि.रत्नागिरी,

विषय :— विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरातीस/ दरपत्रक प्रसिध्दी देणेबाबत.....

महोदय,

सोबत जोडलेल्या दरपत्रकास/ जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी मिळणेकरीता सविनय सादर.

सोबत,
वरील प्रमाणे

आपला विश्वासू,

I/c सहयोगी संशोधन संचालक
प्र. प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि.रायगड.

Scanned by TapScanner